










## बॉयलर वर्ल्ड एक्सपो, आफ्रिका - २०२३



बॉयलर वर्ल्ड एक्सपो , आफ्रिका - २०२३ चे उद्घाटन मा. ना. डॉ सुरेश (भाऊ) दगडू खाडे, कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य, श्रीमती नामग्या खांपा, भारताच्या उच्चायुक्त, नैरोबी, केनिया, श्री. नोबी मचारिया ( सचिव एजी ओद्योगिकीकरण तथा संचालक कृषि उद्योग, केनिया) यांच्या हस्ते व डॉ. मुसा नंदुसी ( सचिव, व्यावसायिक आरोग्य व सुरक्षा संचालनालय, केनिया ), श्री भानू राजगोपालन, व्यवस्थापकीय संचालक, मे. ऑरेंजबीक टेक्नॉलॉजीज प्रा. लि. तसेच श्री. धवल अंतापूरकर, संचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थित पार पडले.

# महाराष्ट्र बाष्पक नियम, १९६२ मधील नियम क्र. ५ अनुसार बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्याचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा प्रशासकीय अहवाल


| अ.क्र. | अनुक्रमणिका |
|---|---|
| १ | प्रस्तावना |
| २ | बाष्पके संचालनालयाचे उदिष्ट व ध्येय |
| ३ | बाष्पके संचालनालयाची विभागवार माहिती |
| ४ | विभागामार्फत देण्यात येणा-या महत्वाच्या सेवा |
| ५ | बाष्पके संचालनालयामार्फत महत्वाच्या धोरणात्मक बाबींवर घेतलेले निर्णय |
| ६ | बाष्पक नोंदणी निरीक्षण |
| ७ | प्रमाणपत्रांचे नूतनीकरण |
| ८ | बाष्पकांची नोंदणी बाष्पदाब चाचणी |
| ९ | नैमित्तिक भेटी (कॅज्यूअल व्हिजीटस) |
| १० | मितोपयोजकांचे नोंदणी निरीक्षण व नियतकालिक निरीक्षण |
| ११ | स्टीम, फीड व ब्लोडाऊन नलिकांचे निरीक्षण |
| १२ | सुट प्राप्त बाष्पके (बेबी बाष्पके) |
| १३ | बाष्पक निर्मिती |
| १४ | व्हॉल्वस, माऊंटिंग्ज/फिटिंग्ज इत्यादींची माहिती |
| १५ | बाष्पक परिचर व बाष्पक परिचालन अभियंता परीक्षा |
| १६ | जमा व खर्चाचे विवरणपत्र |
| १७ | अपघात (बाष्पके अधिनियम,१९२३ मधील कलम २(अ) प्रमाणे) |
| १८ | विशेष बाबी |
| १९ | बाष्पके संचालनालय- एक दृष्टीक्षेप |

## ❖ प्रस्तावना ❖

बाष्पक हा शब्द "बॉयलर" या अर्थाने सामान्य जनतेला ज्ञात आहे. बाष्पक हे उपकरण पाण्यापासून वाफ निर्माण करते. या वाफेच्या दाबावर मोठमोठी यंत्रे गतिमान होतात. हे यंत्र जसे अतिशय उपयुक्त आहे तसेच अत्यंत स्फोटक व धोकादायक आहे. अपघात झाल्यास जिवित व वित्त हानी मोठया प्रमाणावर होऊ शकते. वाफेचे गुणधर्म आणि त्याच्या प्रचंड शक्तीचा अंदाज येत नसल्यामुळे तसेच या विषयाचे अपूर्ण ज्ञान असल्यामुळे, बाष्पक स्फोट होत असत. सन १८०० मध्ये अमेरिकेमध्ये झालेल्या बाष्पक स्फोटात १२०० लोकांचा जीव गेला आणि अमेरिकेत बाष्पकावर सखोल प्रयोग, निरीक्षण आणि संशोधन सुरु झाले. भारतात वाफेच्या इंजिनाचा प्रवेश सन १८२० मध्ये झाला, परंतु येथेही बाष्पकांचे वारंवार स्फोट होत होते. सन १८६३ मध्ये कलकत्ता येथे झालेल्या बाष्पक अपघातात १३ लोक दगावले. अशा भीषण प्रसंगाला सामोरे जात, त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन, बंगाल कायदा, १८६४ तयार करण्यात आला. सन १८६९ साली मुंबई शहरात बाष्पकामुळे २ भीषण अपघात झाले. त्यामध्ये जिवित व वित्त हानी मोठया प्रमाणावर झाली. या हादरवुन टाकणा-या बाष्पक स्फोटांनी "The Bombay Code of Boilers, १८६९" लागु करण्यात आला आणि त्याच वर्षी म्हणजेच सन १८६९ साली स्वतंत्रपणे मुंबई राज्याच्या बाष्पक तपासणी विभागाची स्थापना झाली. पुढे भारतीय बाष्पक अधिनियम, १९२३ हा कायदा राष्ट्रीय स्तरावर अस्तित्वात आला. २००७ मध्ये त्यामध्ये सुधारणा होऊन त्याला बाष्पके अधिनियम, १९२३ (सुधारीत - २००७) असे संबोधन्यात आले. बाष्पकाचे संकल्पचित्र, विनिर्देश प्रमाणपत्र, रेखाचित्र आणि बाष्पकाची निर्मिती, नोंदणी व निरीक्षण इ. बाबतचे विनियम अंतर्भूत केलेला भारत सरकारचा भारतीय बाष्पके विनियम,१९५० अस्तित्वात आला. त्यानंतर अधिनियमाच्या आधारे महाराष्ट्र बाष्पक नियम, १९६२ व महाराष्ट्र मितोपयोजके नियम, १९६५ हे अस्तित्वात आले. आजमितीस वरील अधिनियम, विनियम व नियम यांची अंमलबजावणी बाष्पके संचालनालयाकडून महाराष्ट्र राज्यात केली जात आहे. हा विभाग गेली १५४ वर्षे यशस्वीरित्या काम करत आहे.

## ❖ उद्दिष्ट ❖

राष्ट्रीय हिताकरीता, जीव आणि मालमत्तेचे संरक्षण आणि संवर्धन करणे, तसेच राष्ट्रीय विकासाला गती देण्यास मदतीकरीता, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य मार्फत विविध बाष्पक अधिनियम/नियम/विनीयम यांची अमलबजावणी करणे.

## ❖ ध्येय ❖

- वापरात असलेल्या बाष्पकांची काटेकोरपणे तपासणी आणि जिवित व मालमत्तेचे बाष्पक स्फोटांपासून संरक्षण करणे.
- राष्ट्रीय विकासाच्या वृध्दी करीता, बाष्पकांचे उत्पादना दरम्यान दर्जेदार निरीक्षण करणे.
- बाष्पकांच्या सुरक्षित वापराकरीता बाष्पक परिचर आणि परिचालन अभियंत्यांची परीक्षा घेऊन सक्षम मनुष्यबळ तयार करणे.
- गतिमान, पारदर्शक सार्वजनिक देय व्यवस्थेच्या वचनबध्दतेसाठी, प्रक्रियांचे सुलभीकरण आणि संगणकासह आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे.
- बाष्पक आणि प्रेशर व्हेसल्स यांची निर्मिती, तपासणी आणि अपघातांचे विश्लेषण या क्षेत्रांमध्ये अग्रगण्य निरीक्षण संस्था असे श्रेष्ठत्व जोपासण्याकरीता, आंतरराष्ट्रीय संस्थांशी बरोबरी करणे.
- सुपर क्रिटीकल बाष्पकांची निर्मिती/निरीक्षण या क्षेत्रामध्ये आधुनिक पध्दतींचा विकास करणे.
- सौर ऊर्जेवर चालणा-या बाष्पकांची निर्मिती करणा-या संस्थाना मदत आणि प्रोत्साहन देणे.
- बाष्पक संबंधी समूहामध्ये बाष्पकाच्या सुरक्षित आणि सक्षमपणे वापराकरीता जनजागृती निर्माण करणे.

## ❖ बाष्पके संचालनालयाची विभागवार माहिती ❖

बाष्पके संचालनालयाचे मुख्यालय हे मुंबई येथे असून, संचालक हे कार्यालय प्रमूख आहेत. या संचालनालयाच्या अधिपत्याखाली **०६** विभागीय कार्यालय असून, त्या विभागाच्या अंतर्गत येणारे कार्यक्षेत्र खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभागाचे नांव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी | प्रमुख अधिकारी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | बाष्पके संचालनालय,<br>कामगार भवन, सातवा मजला, प्लॉट नं. सी-२०,ब्लॉक नं.-ई, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.<br>दूरध्वनी क्रमांक : ०२२-२६५७११५५ /१२०१/१३५२/ | संचालक,<br>(विभाग प्रमुख) | संपूर्ण महाराष्ट्र राज्य व मुंबई, मुंबई उपनगर, पालघर, ठाणे, रायगड |

| | | | |
|---|---|---|---|
| | कार्यालयीन ई मेल : dirsb.mumbai@maharashtra.gov.in | | |
| २ | सहसंचालक, बाष्पके, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय,<br>कै. ना.म. लोखंडे, महाराष्ट्र श्रमविज्ञान संस्था, निवासी इमारत क्र.३,<br>गायत्रीनगर, आयटी पार्कजवळ, व्हीएनआयटीच्या समोर, परसोडी,<br>नागपूर-४४००२२.<br>दूरध्वनी क्रमांक: ०७१२-२२४२६८१/२२४७०९२<br>ईमेल: jtdirsb.nagpur@maharashtra.gov.in | सहसंचालक, (प्रादेशिक प्रमुख) | नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, अकोला, बुलढाणा, वर्धा, यवतमाळ, गोंदिया, अमरावती व वाशिम |
| ३ | सहसंचालक, बाष्पके, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,<br>कामगार कल्याण भवन, दुसरा मजला, चिंचवड,<br>पुणे-४११०१९.<br>दूरध्वनी क्रमांक: ०२०-२७३७१६९७/१०५१<br>ईमेल: jtdirsb.pune@maharashtra.gov.in | सहसंचालक, (प्रादेशिक प्रमुख) | पुणे व सातारा |
| ४ | सहसंचालक, बाष्पके, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर (अहिल्या नगर)<br>यांचे कार्यालय, "हरेश", १६, बिजली को.ऑप. हौसिंग सोसायटी,<br>शिलाविहार जवळ, वसंत टेकडी, अहमदनगर-४१४००३<br>दूरध्वनी क्रमांक: ०२४१-२४२१७४५<br>ईमेल: jtdirsb.ahmednagar@maharashtra.gov.in | सहसंचालक, (प्रादेशिक प्रमुख) | अहिल्या नगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड. |
| ५ | सहसंचालक, बाष्पके,महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे कार्यालय,<br>गाळा क्र.४, उद्योग भवन, आयटीआय जवळ, त्रंबक रोड, सातपूर,<br>नाशिक-४२२००७,<br>दूरध्वनी क्रमांक: ०२५३-२३६५३५७<br>ईमेल: jtdirsb.nashik@maharashtra.gov.in | सहसंचालक, (प्रादेशिक प्रमुख) | नाशिक, धुळे, नंदूरबार व जळगांव |
| ६ | सहसंचालक, बाष्पके,महाराष्ट्र राज्य, कोल्हापूर यांचे कार्यालय,<br>बचतगंगा ईमारत, रमणमला, कसबा बावडा रोड,<br>कोल्हापूर -४१६ ००२,<br>दूरध्वनी क्रमांक: ०२३१-२५४२९२०/९०९<br>ईमेल: jtdirsb.kolhapur@maharashtra.gov.in | सहसंचालक, (प्रादेशिक प्रमुख) | कोल्हापूर, सांगली, रत्नागिरी व सिंधुदूर्ग |
| ७ | सहसंचालक, बाष्पके,महाराष्ट्र राज्य, सोलापूर यांचे कार्यालय,<br>वितराग व्हर्टेक्स, पहिला मजला, ८३ ए, रेल्वे लाईन्स,<br>नवल पेट्रोल पंपसमोर, डफरीन चौक, सोलापूर-४१३००१.<br>दूरध्वनी क्रमांक: ०२१७-२३१७०१५,<br>ईमेल: jtdirsb.solapur@maharashtra.gov.in | सहसंचालक, (प्रादेशिक प्रमुख) | सोलापूर, लातूर, धाराशिव, नांदेड, हिंगोली. |

## ❖ विभागामार्फत देण्यात येणा-या महत्वाच्या सेवा ❖

- बाष्पक/मितोपयोजक यांचे नोंदणी निरीक्षण.
- बाष्पक/मितोपयोजक यांचे वार्षिक/द्विवार्षिक निरीक्षण.
- बाष्पक/मितोपयोजकांस अपघात झाल्यास चौकशी करणे.
- मालकी हक्काचे हस्तांतरण.
- बाष्पक मालकाने किंवा कंत्राटदाराने नवीन प्रकल्पांतर्गत नवीन पाईप लाईनची जोडणी/उभारणी तसेच जुन्या पाईपलाईनची दुरुस्ती किंवा बदली करणेसाठीचे निरीक्षण व मान्यता.
- बाष्पक, मितोपयोजक व त्यांचे सुटे भाग, हिट एक्सचेंजर, प्रेशल व्हेसल यांचे निर्मिती दरम्यान निरीक्षण व प्रमाणीकरण.

- कास्टींगचे, फोर्जिगंचे निर्मिती दरम्यान निरीक्षण व प्रमाणीकरण.
- सांध्यात्याची (वेल्डर) चाचणी व पुर्नचाचणी.
- वेल्डींग इलेक्ट्रोडची आरंभीची व नियतकालीक चाचणी.
- बाष्पक/मितोपयोजक व त्याचे सुटे भाग यांची निर्मिती/दुरुस्तीकार, बाष्पकांच्या भागांची उभारणी, चाचणी प्रयोगशाळा, पाईप/टयूब, फौऊंड्री, फोर्जशॉप, झडपा, फिटींग, वेल्डिंग इलेक्ट्रोड यांचे निर्माते तसेच पाईप फॅब्रिकेटर इत्यादींच्या कार्यशाळेस मान्यता व त्यांचे वार्षिक नुतनीकरण.
- बाष्पक परिचालन अभियंता परीक्षा.
- प्रथम व व्दितीय वर्ग बाष्पक परिचर परीक्षा.
- प्रमाणपत्राचे पृष्ठांकन व नक्कल प्रत.
- बाष्पक/मितोपयोजक स्क्रॅपिंग
- युटीएम, इमपॅक्ट मशीन कॅलिब्रेशन.
- बाष्पक/मितोपयोजक व त्याच्या सुट्या भागांचे डिझाईन व निर्मितीच्या आरेखनास मान्यता देणे.

### ❖ बाष्पके संचालनालयामार्फत महत्वाच्या धोरणात्मक बाबींबर घेतलेले निर्णय ❖

महाराष्ट्र शासनाच्या "मेक इन महाराष्ट्र" या योजने अंतर्गत व्यवसाय सुलभीकरण (ईझ ऑफ डुईंग बिझनेस) साध्य करण्याकरीता या संचालनालयाने बाष्पक वापर कर्त्यांसाठी खालील योजना उपलब्ध करून दिल्या आहेत.

| योजनेचा प्रकार | योजनेचा उददेश | दिल्या जाणा-या लाभाचे स्वरूप |
|---|---|---|
| ऐच्छिक | या योजनेकरीता सुरक्षेशी तडजोड न करता ज्या बाष्पके/मितोपयोजकाकरीता या योजनेचा पर्याय स्विकारण्यांत आलेला आहे त्या बाष्पके/मितीपयोजकांची तपासणी करण्यांकरीता निरीक्षण अधिकारी व सक्षम व्यक्ती यांच्या भेटी कमी करणे. | सदर योजना पाच वर्षासाठी लागू असेल व पाच वर्षातून एकदाच त्यांचे निरीक्षण (Random Inspection) होईल व दरवर्षी योजनेत भाग घेतलेल्या कारखान्यापैकी २०% कारखान्यांचे पाचवर्षातून एकदाच निरीक्षण होईल. |
| अ) | **स्वयं प्रमाणिकरण योजना** (Self Certification Cum-Consolidated Annual Return Scheme) **:** शासन निर्णय, उदयोग, उर्जा व कामगार विभाग क्रं -०४१५/प्र.क्र.२३/कामगार-१, दिनांक २४/०६/२०१५ अन्वये १००० वर्ग मीटर तपन क्षमता व त्यापेक्षा अधिक तपन क्षमता असलेल्या बाष्पके/मितोपयोजकांसाठी या योजनेचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. | |
| ब) | **त्रयस्थ आस्थापनांमार्फत निरीक्षण** (Third Party Inspection)**:** बाष्पके अधिनियम, १९२३ मध्ये २००७ साली सुधारणा करण्यात आल्या. त्याअनुषंगाने सर्व प्रकारच्या बाष्पकांच्या निरीक्षणाकरीता केंद्रीय बाष्पक मंडळाने मान्यता दिलेल्या त्रयस्थ आस्थापनांमार्फत तसेच स्वतंत्र सक्षम व्यक्तीव्दारे बाष्पकांचे निरीक्षण व प्रमाणीकरणाची परवानगी देण्यांत आली आहे. | |

### ❖ महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लोकसेवा ❖

दिनांक २६/०१/२०१६ पासून दोन सेवा, तसेच दि.२९/६/२०१६ पासून आणखी दोन सेवा या कार्यालया मार्फत ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या होत्या. त्याचप्रमाणे दि.२०/६/२०१७ पासून आणखी अठरा सेवा वरील अधिनियमांतर्गत ऑनलाईन उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्याचा विहित कालावधी, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | लोक सेवेचा तपशिल | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मालकी हक्काचे हस्तांतरण | ७ दिवस | तांत्रिक/निरीक्षण शाखेचा तांत्रिक अधिकारी/अधिक्षक | सहसंचालक,बाष्पके, मुंबई/प्रादेशिक कार्यालये | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २ | प्रमाणपत्राची नक्कल प्रत | ७ दिवस | तांत्रिक/निरीक्षण शाखेचा तांत्रिक अधिकारी/अधिक्षक | सहसंचालक,बाष्पके, मुंबई/प्रादेशिक कार्यालये | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ३ | बाष्पके व मितोपयोजकांची नोंदणी, | | संबधित क्षेत्रिय कार्यालयाचे सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| अ) | महाराष्ट्र राज्यात निर्मित, | ३० दिवस | | | |
| आ) | महाराष्ट्र राज्याबाहेर निर्मित | ३० दिवस | | | |
| ४ | बाष्पके व मितोपयोजकांच्या प्रमाणपत्राचे नुतणीकरण | १७ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ५ | बाष्पके निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ६ | बाष्पके निर्मात्यांच्या मान्यतेचे नुतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ७ | बाष्पके/मितोपयोजके उभारणीची मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ८ | बाष्पके/मितोपयोजके उभारणीच्या मान्यतेचे नुतनीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ९ | मितोपयोजके निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १० | मितोपयोजके निर्मात्यांच्या मान्यतेचे नुतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ११ | प्रेशर व्हेसल्स निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | प्रेशर व्हेसल्स निर्मात्यांच्या मान्यतेचे नुतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १३ | प्रेशर पार्टस निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १४ | प्रेशर पार्टस निर्मात्यांच्या मान्यतेचे नुतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १५ | हिट एक्सचेंजर निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १६ | हिट एक्सचेंजर निर्मात्यांच्या मान्यतेचे नुतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १७ | स्मॉल इंडस्ट्रियल बाष्पके निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १८ | स्मॉल इंडस्ट्रियल बाष्पके निर्मात्यांच्या मान्यतेचे नुतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १९ | बाष्पके व मितोपयोजके दुरुस्तीकारांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २० | बाष्पके व मितोपयोजके दुरूस्तीकारांच्या मान्यतेचे नुतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २१ | पाईप फॅब्रिकेटर म्हणून मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २२ | पाईप फॅब्रिकेटर म्हणून मान्यतेचे नुतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |

## ❖ बाष्पक नोंदणी निरीक्षण ❖

अहवालांकित वर्षात महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण **३६०** नवीन बाष्पकांची नोंदणी झाली. यामध्ये **५३** लघु औद्योगिक बाष्पकांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्यातून **२५** बाष्पके निरनिराळ्या राज्यात स्थानांतर होऊन गेली, तर **२७** बाष्पके निरनिराळ्या राज्यातून या राज्यात स्थांनातरीत होऊन आली.

## ❖ प्रमाणपत्रांचे नुतनीकरण ❖

अहवालांकित वर्षात एकुण **४१८९** बाष्पकांना पुढील वापरासाठी प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आली. त्यामध्ये पहिली नोंदणी बाष्पचाचणी घेतल्यानंतर निर्गमित करण्यात आलेल्या एकूण **२८६** प्रमाणपत्रांचा समावेश आहे. तसेच अधिनियमामधील नियम-३७६ (फफ) व ३७६ (फफफ) अनुसार निरीक्षण करण्यात आलेल्या **१०९** बाष्पकांचा समावेश आहे. भारतीय सेनादलाच्या मालकीच्या **०३** बाष्पकांना प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आली.

अहवालांकित वर्षात निरीक्षण केलेल्या बाष्पकांपैकी **६४२** बाष्पकांना आवश्यक तेथे दुरूस्त्या करण्यात आल्या. तसेच **१३४** बाष्पकांना, बाष्पकांच्या स्थितीमुळे व मालकांच्या विनंतीनुसार अल्प मुदतीचे प्रमाणपत्रे देण्यात आली. **१२** बाष्पकांच्या बाबतीत बाष्पक मालकांनी पुढील निरीक्षण व जलदाब चाचणीसाठी सादर न केल्यामुळे प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आलेली नाहीत. तसेच बाष्पक अधिनियम-१९२३ च्या कलम-३४, उपकलम-२ अन्वये कलम-६ च्या खंड-क उपबंधाच्या अंमलबजावणीतून **०४** बाष्पकांना सूट देण्यात आली आहे.

अहवालांकित वर्षात व मागील दोन वर्षाच्या कालावधीत **नुतनीकरणानंतर प्रमाणपत्रे** निर्गमित केलेल्या बाष्पकांची विभागवार संख्या खालील तक्यात दर्शविलेली आहे.

| प्रमाणपत्राचे स्वरुप | वर्ष | विभाग | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बृहन्मुंबई, रायगड, पालघर, ठाणे | नागपूर | पुणे | अ' नगर | नाशिक | कोल्हापूर | सोलापूर | |
| नुतनीकरणानंतर | २०२१-२२ | १०४९ | ४९६ | ६३५ | ३६० | ४१८ | ५८० | २२२ | ३७६० |
| | २०२२-२३ | १०९६ | ५०१ | ५९१ | ३८० | ४३१ | ५२८ | २१६ | ३७४३ |
| | **२०२३-२४** | **१०८७** | **४६७** | **६२०** | **३८४** | **४७२** | **५५१** | **२१०** | **३७९१** |

अहवालांकित वर्षात व मागील दोन वर्षाच्या कालावधीत **विनियम ३७६ (फफ/(फफफ)** नुसार प्रमाणपत्रे निर्गमित केलेल्या बाष्पकांची विभागवार संख्या खालील तक्यात दर्शविलेली आहे.

| प्रमाणपत्राचे स्वरुप | वर्ष | विभाग | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बृहन्मुंबई, रायगड, पालघर, ठाणे | नागपूर | पुणे | अ' नगर | नाशिक | कोल्हापूर | सोलापूर | |
| विनियम ३७६ (फफ/(फफफ) नुसार प्रमाणपत्रे | २०२१-२२ | ६१ | १९ | ० | ० | २ | ३ | ० | ८५ |
| | २०२२-२३ | ७४ | २१ | ० | १ | ३ | १२ | ० | १११ |
| | **२०२३-२४** | **७७** | **२५** | **०** | **१** | **१** | **४** | **१** | **१०९** |

अहवालांकित वर्षात व मागिल दोन वर्षाच्या कालावधीत, नवीन बाष्पकांचे नोंदणी निरीक्षण व नोंदणी जलदाब चाचणी, तसेच निरीक्षण व जलदाब चाचणी केल्यानंतर **तात्पुरते आदेश** निर्गमित केलेल्या बाष्पकांची विभागवार संख्या खालील तक्त्यात दर्शविलेली आहे.

| आदेशांचे स्वरुप | वर्ष | बृहन्मुंबई, रायगड, पालघर व ठाणे | नागपूर | पुणे | अ' नगर | नाशिक | कोल्हापूर | सोलापूर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रथम तात्पुरते आदेश | २०२१-२२ | २९२ | १३५ | ७१ | ९२ | ९४ | १४० | ९३ | ९१७ |
| | २०२२-२३ | ३१३ | १६४ | २१० | १२२ | ११३ | २०० | १३६ | १२५८ |
| | **२०२३-२४** | **२७६** | **२०९** | **१३४** | **१४९** | **१०८** | **१९५** | **१२४** | **११९५** |

तसेच अहवालांकित वर्षात निरीक्षण व जलदाब चाचणी न घेता सहा महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यात आलेल्या तात्पुरत्या आदेशांची संख्या **७८६** आहे.

अहवालांकित वर्षात व मागील दोन वर्षाच्या कालावधीत **"बाष्पके अधिनियम, १९२३ च्या कलम ३४, उपकलम २ अन्वये कलम ६ च्या खंड (क) उपबंधाच्या अंमलबजावणी अन्वये"** सुट देण्यात आलेल्या बाष्पकांची विभागवार संख्या खालील तक्यात दर्शविलेली आहे.

| परवानगी पत्राचे स्वरुप | वर्ष | विभाग | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बृहन्मुंबई, रायगड, पालघर, ठाणे | नागपूर | पुणे | अ' नगर | नाशिक | कोल्हापूर | सोलापूर | |
| कलम ६ (क) अन्वये सुटप्राप्त बाष्पके | २०२१-२२ | ७ | १ | ० | १ | ० | ० | ० | ९ |
| | २०२२-२३ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | **२०२३-२४** | **३** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **४** |

अहवालांकित वर्षात व मागील दोन वर्षाच्या कालावधीत **सुट प्राप्त बाष्पकांच्या (MR/EX)** निरीक्षणाअंती परवानी पत्रे देण्यात आलेल्या बाष्पकांची विभागवार संख्या खालील तक्यात दर्शविलेली आहे.

| परवानगी पत्राचे स्वरुप | वर्ष | विभाग | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बृहन्मुंबई, रायगड, पालघर, ठाणे | नागपूर | पुणे | अ' नगर | नाशिक | कोल्हापूर | सोलापूर | |
| सुट प्राप्त (MR/EX) बाष्पके | २०२१-२२ | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ |
| | २०२२-२३ | ५ | ० | ३ | ० | ० | ० | ० | ८ |
| | **२०२३-२४** | **४** | **०** | **३** | **०** | **०** | **०** | **०** | **७** |

अहवालांकित वर्षात व मागील दोन वर्षाच्या कालावधीत **चालु असलेल्या बाष्पकांची** विभागवार संख्या खाली तक्त्यात दर्शविलेली आहे.

| | वर्ष | विभाग | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बृहन्मुंबई, रायगड, पालघर, ठाणे | नागपूर | पुणे | अ' नगर | नाशिक | कोल्हापूर | सोलापूर | |
| एकुण चालु बाष्पके | २०२१-२२ | १४१३ | ६५१ | ७०६ | ४५३ | ५१४ | ७२३ | ३१५ | ४७७५ |
| | २०२२-२३ | १४९० | ६८६ | ८०४ | ५०३ | ५४७ | ७४० | ३५२ | ५१२२ |
| | **२०२३-२४** | **१४४७** | **७०२** | **७५७** | **५३४** | **५८१** | **७५०** | **३३५** | **५१०६** |

अहवालांकित वर्षात आणि मागील २ वर्षात निरीक्षण करून प्रमाणित केलेल्या व तात्पुरते आदेश देण्यात आलेल्या **निरनिराळ्या प्रकारच्या बाष्पकांची** आकडेवारी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाष्पकांचे प्रकार | २०२१-२२ | २०२२-२३ | **२०२३-२४** |
|---|---|---|---|---|
| १ | स्मॉल इंडस्ट्रीयल बॉयलर (SIB) | ३२९ | ३७४ | **३२२** |
| २ | स्मोक ट्युब | २६८० | २७६९ | **२७०८** |
| ३ | कंपोझिट | ६०० | ७६३ | **८४६** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | वॉटर ट्युब (युटीलीटी वगळून) | ७८७ | ८२७ | **८३७** |
| ५ | वेस्ट हिट | २२३ | २१८ | **२२५** |
| ६ | थर्मीक फ्लुईड हिटेड स्टिम जनरेटर | ४५ | ९५ | **८६** |
| ७ | युटीलिटी (उर्जा निर्मिती केंद्रातील) | ५८ | ४६ | **६५** |
| ८ | सुपर लँकेशायर/लँकेशायर/कोचरन | १ | १ | **०** |
| ९ | कॉर्निश/मरीन | १ | १ | **०** |
| १० | लोकोमोटीव्ह | १ | १ | **०** |
| ११ | व्हर्टिकल क्रॉस ट्युब | ३४ | ४ | **४** |
| १२ | इलेक्ट्रोड | १० | १६ | **१२** |
| १३ | कॉईल टाईप फोर्स्ड सर्क्यूलेशन (एसआयबी वगळून) | ६ | ७ | **१** |
| | **एकूण :** | **४७७५** | **५१२२** | **५१०६** |

अहवालांकित वर्षात व मागील २ वर्षात निरीक्षण करून प्रमाणित केलेल्या व तात्पुरते आदेश देण्यात आलेल्या निरनिराळ्या **तपनक्षमतेच्या** ( **चौरस मिटरमध्ये** ) बाष्पकांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **बाष्पकांचे प्रकार** | २०२१-२२ | २०२२-२३ | **२०२३-२४** |
|---|---|---|---|---|
| १ | स्मॉल इंण्डस्ट्रीअल बॉयलर | ३२९ | ३७४ | **३२२** |
| २ | बाष्पक तपन क्षमता १ चौ.मि.च्या पुढे व १००० चौ.मि.पेक्षा कमी | ३७६८ | ४०२० | **४०६७** |
| ३ | बाष्पक तपन क्षमता १००० चौरस मिटर व त्यापेक्षा अधिक | ६७८ | ७२८ | **७१७** |
| | **एकूण :** | **४७७५** | **५१२२** | **५१०६** |

बाष्पकांना बारा महिन्यापेक्षा कमी मुदतीसाठी खालील कारणासाठी **अल्प मुदतीची प्रमाणपत्रे** (STC) देण्यात आली.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **बाष्पकांची संख्या** |
|---|---|---|
| १ | सामूहिक निरीक्षणासाठी | ० |
| २ | बाष्पकांच्या स्थितीमुळे | ४ |
| ३ | मालकांच्या इच्छेनुसार | १३० |
| | **एकूण :** | **१३४** |

अहवालांकित वर्षात महाराष्ट्र बाष्पक नियम, १९६२ मधील नियम-३८ अन्वये एकूण **०५** प्रमाणपत्राची नक्कल प्रत देण्यात आली.

बाष्पक चालु असतांना त्यास हानी पोहचल्याचे दिसून आल्याने बाष्पक अधिनियम १९२३, कलम ११ पोटकलम (ब) अन्वये एकूण **०४** बाष्पकांची प्रमाणपत्रे काढुन घेण्यात आली.

तसेच अधिनियम १४ (२) अन्वये नियुक्त केलेल्या तारखेस मालकांनी बाष्पक, विहित निरीक्षणासाठी तयार न ठेवल्यामुळे भेटी निष्फळ ठरल्या असे अहवालांकित वर्षात एकूण **०९** प्रकरणे घडली आहेत. सबब अशा सर्व प्रकरणांत नव्याने फी आकारण्यात आली आहे.

कंपनीच्या उत्पादनावर परिणाम होऊ नये म्हणुन बाष्पक मालकास जेव्हा त्यांचे बाष्पकाचे तसेच मितिपयोजकाचे निरीक्षण तातडीने करुन घेणे आवश्यक वाटते तेव्हा त्यांचे खास विनंतीवरुन महाराष्ट्र बाष्पक नियम, १९६२ मधील नियम १६ अन्वये शनिवार,

रविवार व सार्वजनिक सुटटींच्या दिवशी तसेच सुर्यास्तानंतर विशेष भेटीचे आयोजन करण्यात येते. चालू वर्षी विशेष भेटी अन्वये एकूण **२५४** निरीक्षणे हि अतिरिक्त फी आकारुन करण्यात आली.

अहवालांकित वर्षाच्या कालावधीत व मागील २ वर्षात बाष्पकांची केलेली एकूण निरीक्षणे व जलदाब चाचणी इत्यादी बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| सन | अंतर्गत व बाहय निरीक्षण | स्तंभ (२) साठी पुढील निरीक्षणे ज्यासाठी अतिरिक्त फि आकारण्यात आली नाही | गळती निरीक्षण | जलदाब चाचणी आणि दुरुस्ती पडताळणी | जलदाब चाचणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २०२१-२२ | ४६३३ | ४०७ | ९१ | ६९० | ४२५६ |
| २०२२-२३ | ४८११ | ५२५ | ७४ | ७९९ | ५२४० |
| **२०२३-२४** | **४८३०** | **३२५** | **८३** | **६४९** | **४९८६** |

### ❖ नवीन बाष्पकांची नोंदणी बाष्पदाब चाचणी ❖

अहवालांकित वर्षात व मागील दोन वर्षाच्या कालावधीत नवीन बाष्पकांकरीता पहिली नोंदणी बाष्पचाचणी घेतल्यानंतर बाष्पकांना प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आल्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| सन | बाष्पकांची बाष्पदाब चाचणी |
|---|---|
| २०२१-२२ | १९१ |
| २०२२-२३ | २०४ |
| **२०२३-२४** | **२८६** |

चालु बाष्पकांचे सेफ्टी वॉल्व काही कारणास्तव बदली केले असल्यास, बदललेले सेफ्टी व्हॉल्व सेट करण्यासाठी बाष्पदाब चाचणी घेण्याकरीता भेट देण्यात येते. अहवालांकित वर्षामध्ये अशा एकुण ८८ चाचण्या करण्यात आल्या.

### ❖ नैमित्तिक भेटी (कॅज्यूअल व्हिजीटस) ❖

नैमित्तिक भेटी या शिर्षाखाली अधिका-यांनी निरनिराळ्या मिल्स, कंपनी वगैरेना भेटी देऊन तेथील चालू किंवा बंद स्थितीत तपासणी केलेल्या बाष्पकांची आकडेवारी खाली दिलेली आहे. तसेच बाष्पक अधिनियम व त्याखालील नियमांच्या तरतुदीनुसार बाष्पके चालतात किंवा नाही हे पाहण्यासाठी दिलेल्या भेटींचा अंतर्भाव केलेला आहे.

| सन | नैमित्तिक भेटी |
|---|---|
| २०२१-२२ | ४९० |
| २०२२-२३ | ५६९ |
| **२०२३-२४** | **५३०** |

अधिका-यांच्या नियोजीत भेटी दरम्यान, परिसरातील कारखान्यांना भेटी देऊन, जर त्या कारखान्यांमध्ये अनाधिकृत किंवा बेकायदेशीर बाष्पक आढळल्यास, अशा बाष्पकांना प्रतिबंधीत करुन, बाष्पके अधिनियम व नियमांनुसार निरीक्षण करुन घेण्यास सांगितले जाते. यानुसार अहवालांकीत वर्षामध्ये एकूण **०६** अनाधिकृत बाष्पके आढळली. त्यानुसार या बाष्पकांना प्रतिबंधीत आदेश तसेच बाष्पकांची धारण क्षमता चाचणी करणेबाबत सुचना निर्गमित करणेत आल्या.

अहवाल कालावधीत एकूण **२६०६** बंद बाष्पके आहेत. निरीक्षण अधिकारी अशा बाष्पकांना विभागातील निरीक्षणाच्या वेळी नैमित्तिक भेटी देऊन, ती बंद आहेत याची खाञी करून घेतात व त्याची नोंद स्मरणपुस्तिकेत घेण्यात येते.

### ❖ मितोपयोजकांचे नोंदणी निरीक्षण व नियतकालिक निरीक्षण ❖

चालू अहवाल कालावधीत एकूण **१०** नवीन मितोपयोजकांचे नोंदणी निरीक्षण करण्यात आले. प्रमाणपत्रांच्या नुतनीकरणासाठी भेटी देऊन, निरीक्षण व जलदाब चाचणी घेतल्यानंतर, **३३** मितोपयोजकांना तात्पुरते आदेश देण्यात आले व एकूण **१०२** मितोपयोजकांना प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आली. तसेच अहवाल कालावधीत बंद असलेली **१६३** मितोपयोजके आहेत.

### ❖ स्टीम, फीड व ब्लो डाऊन नलिकांचे निरीक्षण ❖

बाष्पक/मितोपयोजकांच्या निरीक्षणाशिवाय बाष्पक आणि मितोपयोजके यांच्या वापरात येणाऱ्या स्टीम, फीड व ब्लो डाऊन नलिका व ट्युबचे निरीक्षणही केले जाते. या निरीक्षणासाठी दिलेल्या भेटीचा तपशिल खालील/पुढील तक्त्यात दिला आहे.

| सन | एकूण भेटी | नलिकांचे निरीक्षण | नलिकांचे वेल्ड प्रिपरेशन निरीक्षण | नलिकांची जलदाब चाचणी | १०० मि.मि. व्यासापर्यंत लांबी (मिटर्समध्ये) | १०० मि.मि. व्यासापेक्षा जास्त लांबी (मिटर्समध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|
| २०२१-२२ | २३६० | ९१६ | ७७५ | ६६९ | ११०८०७ | ४३५६२ |
| २०२२-२३ | २६८६ | ९५७ | ८७० | ८५७ | ११५३२० | ३५५१० |
| **२०२३-२४** | **२४७९** | **८९३** | **८१५** | **७७१** | **८६४९६.३६३** | **३७९८८.३४७** |

### ❖ सुटप्राप्त बाष्पके (बेबी बाष्पके) ❖

| वर्ष | मुंबई | नागपूर | पुणे | अहमद नगर | नाशिक | सोलापूर | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३१.३.२०२३ पर्यंत अभिलेख्याप्रमाणे असलेली प्रकरणे | २३९८ | ५१ | २०६ | ६० | ५९ | ९ | २९७ | **३०८०** |
| **२०२३-२४ मध्ये देण्यात आलेली नाहरकत प्रमाणपत्रे** | २७ | ६ | २२ | ३ | ४ | ० | १ | **६३** |

### ❖ बाष्पक निर्मिती ❖

निर्मितीखाली असलेल्या बाष्पकांचे निरीक्षण करणे व ते प्रमाणित करणे हे या संचालनालयाच्या कामाचे महत्त्वाचे अंग आहे. बाष्पकांच्या निरीक्षणासाठी संचालनालयातील अधिका-यांनी दिलेल्या भेटीची संख्या, निर्मीती केलेल्या बाष्पकांची संख्या इत्यादींचा या वर्षाचा व मागील दोन वर्षाचा तपशिल खालील तक्त्यात दर्शविला आहे.

| सन | निरीक्षणासाठी दिलेल्या भेटींची संख्या | निर्मिती करण्यात आलेली बाष्पके व इतर पार्ट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बाष्पके | लघु औद्योगिक बाष्पके | मितोपयोजके | हिटएक्सचेंजर | प्रेशर व्हेसल्स | प्रेशर पार्ट |
| २०२१-२२ | ४०९५ | ९५४ | ९० | ३० | ०८ | १६१ | २०४९ |
| २०२२-२३ | ४५९२ | ९४७ | ८० | ३८ | ३५ | १३८ | २५६१ |
| **२०२३-२४** | **५३१५** | **८७८** | **९०** | **३५** | **६२** | **१६८** | **२२१४** |

### ❖ व्हॉल्वस, माऊंटिंग/फिटिंग्ज इत्यादीची माहिती ❖

विनियमाप्रमाणे राज्यातील विविध कंपन्यांनी निर्मिती केलेल्या बाष्पक माउटिंग्ज आणि फिंटीग्जचे तसेच विविध प्रकारच्या झडपा व उपकरणे इत्यादींचे निरीक्षण करण्याचे काम या संचालनालयामार्फत केले जाते.

यासाठी दिलेल्या भेटींची संख्या व निरीक्षण करून प्रमाणित केलेल्या झडपा व उपकरणे यांची संख्या खालील तक्त्यात व्यासानुसार तपशिलवार दिली आहे.

**व्हॉल्वस, माऊंटिंग/फिटिंग्ज व्यासानुसार निर्मीती (मि.मि. मध्ये)**

| वर्ष | निरीक्षणा साठी भेटी | २५ मिमि पर्यंत | २५ मिमि पेक्षा जास्त ५० मिमि पर्यंत | ५० मिमि पेक्षा जास्त १०० मिमि पर्यंत | १०० मिमि पेक्षा जास्त १५० मिमि पर्यंत | १५० मिमि पेक्षा जास्त २५० मिमि पर्यंत | २५० मिमि पेक्षा जास्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०२१-२२ | १७१५ | २३१३५४ | ८८०४९ | ५७८३६ | २४१८३ | ११०७९ | ५६३३ | **४१८१३४** |
| २०२२-२३ | १४२५ | २५७२१५ | १०५१९५ | ६९६३३ | ३०९१२ | ६८९६ | ६७४४ | **४७६५९५** |
| २०२३-२४ | १२८५ | ३१४००८ | ९९००९ | ८१०७८ | ४००७१ | १०३८४ | १३२९३ | **५५७८४३** |

### ❖ बाष्पक परिचर व बाष्पक परिचालन अभियंता परीक्षा ❖

| परीक्षेचे नांव | परीक्षेत बसलेल्या उमेदवारांची संख्या | उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची संख्या | उत्तीर्ण प्रमाण |
|---|---|---|---|
| बाष्पक परिचालन अभियंता | ६८२ | २८६ | **४१.९४ %** |
| प्रथम वर्ग बाष्पक परिचर क्षमता परीक्षा | ८४६ | ५२४ | **६१.९४ %** |
| द्वितीय वर्ग बाष्पक परिचर क्षमता परीक्षा | १३९७ | ९८१ | **७०.२२ %** |

### ❖ सांध्यात्यांची (वेल्डर्स) प्रमाणपत्र परिक्षा ❖

अहवाल वर्षात भारतीय बाष्पक विनियम, १९५० नुसार एकुण ०८ सांध्यात्यांना (वेल्डर्स) प्रमाणपत्रे देण्यात आली.

### ❖ बाष्पके अधिनियम, १९२३ मधील कलम ३४, ६ (क) च्या तरतुदीपासून बाष्पकांना सूट ❖

बाष्पके अधिनियम, १९२३ मधील कलम ३४ च्या अनुषंगाने खालील नमुद केलेल्या बाष्पकांना त्यांच्या समोर दर्शविलेल्या कालावधीसाठी कलम ६ (क) च्या तरतुदीपासून सूट देण्यात आली.

| क्रमांक | कंपनीचे नाव | बाष्पक क्रमांक | सुट मंजुर केलेला कालावधी |
|---|---|---|---|
| १ | मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., मुंबई रिफायनरी, माहुल, मुंबई-७४ | एमआर/१६७०८ | २६/०६/२०२३ ते २५/०६/२०२४ |
| २ | मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., मुंबई रिफायनरी, माहुल, मुंबई-७४ | एमआर/१६७०९ | २६/०६/२०२३ ते २५/०६/२०२४ |
| ३ | मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., मुंबई रिफायनरी, माहुल, मुंबई-७४ | एमआर/११०५९ | १२ /०७ /२०२३ ते ११/०७/२०२४ |
| ४ | मे. महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र, ऊर्जानगर, जि. चंद्रपूर | एमआर/१६६०१ | ११ /०८ /२०२३ ते १०/०२/२०२४ |

### ❖ जमा व खर्चाचे विवरण पत्र ❖

या संचालनालयाचा एकूण जमा होणारा महसूल तसेच योजनेतर व योजनाअंतर्गत खर्च खालील प्रमाणे आहे. ( महालेखापाल कार्यालयाच्या नोंदीशी केलेल्या पडताळणीप्रमाणे )

| वर्ष | जमा महसुल रुपये | योजनेत्तर खर्च रुपये | योजनांतर्गत खर्च रुपये | जमेच्या तुलनेत होणारा खर्च % |
|---|---|---|---|---|
| २०२१-२२ | ११,८५,३६,२५९ | ८,२९,५७,५२८ | १७,६८,२७८ | **७१.४८** |
| २०२२-२३ | १२,९४,१५,९६० | ९,३८,४३,७३० | ६०,८७,१८७ | **७७.२१** |
| २०२३-२४ | १३,१०,०९,२५१ | ९,५९,११,१८२ | २९,६०,४०२ | **७५.४७** |

### ❖ अपघात (बाष्पके अधिनियम,१९२३ मधील कलम २(अ) प्रमाणे) ❖

“अपघात” म्हणजे बाष्पकाचा किंवा त्याच्या सुट्या भागाचा स्फोट, ज्यामध्ये त्याची कुवत कमी होऊन किंवा त्यामधून अनियंत्रित पाणी किंवा वाफेची गळती होऊन, मनुष्यहानी किंवा दुखापत किंवा मालमत्तेचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण होईल, अशा स्वरूपाचे कोणतेही बाष्पकाचे किंवा त्याच्या सुट्या भागाचे झालेले नुकसान.

| वर्ष | अपघात | जिवीत हानी (मृत व्यक्तींची संख्या) | दुखापत/भाजलेल्या व्यक्तींची संख्या |
|---|---|---|---|
| २०२१-२२ | ०२ | ०० | ०० |
| २०२२-२३ | ०६ | ०५ | ०३ |
| **२०२३-२४** | **०२** | **०१** | **००** |

सन २०२३-२४ या वर्षाच्या कालावधीत एकुण **०२** बाष्पकांस अपघात झाला. अपघातांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:

१. मे.श्रीनीधी ॲग्रो प्रोसेसिंग ॲण्ड कोल्ड स्टोरेज, प्लॉट नं.२५९, सावली, ता.मिरज जि.सांगली-४१६४१० यांच्या मालकीचा बाष्पक क्रमांक एमआर/१७४४३ ला दिनांक ०३/१२/२०२३ रोजी सकाळी १२ वाजुन ५१ मिनीटाच्या सुमारास अपघात झाला. सदरील अपघाताची चौकशी करीता श्री.वि.म.बारमाटे, सहसंचालक बाष्पके, कोल्हापूर व श्री.सु.बा.देशपांडे उपसंचालक बाष्पके, कोल्हापूर यांनी दिनांक ०३/१२/२०२३ रोजी अपघाताची चौकशी करीता कारखान्याला भेट दिली. श्री.सु.बा.देशपांडे, उपसंचालक बाष्पके, कोल्हापूर यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये असे आढळुन आले की, बाष्पकात अचानक वाफेचा दाब जास्त वाढल्यामुळे बाष्पकाचा स्फोट झाला. सदर अपघातामध्ये एक व्यक्ती जखमी होऊन दवाखान्यात उपचारा दरम्यान दि.०३/१२/२०२३ रोजी मृत्यु पावला.

२. मे.बारामती ॲग्रो लि., पो. सुरेगाव रास्ते,तालुका येवला, जि.नाशिक यांच्या मालकीचा बाष्पक क्रमांक एमआर/१५३४५ ला दिनांक ०५/१२/२०२४ रोजी रात्री २.३० वाजता अपघात झाल्याचे कारखान्याचे व्यवस्थापक यांनी दिनांक ०६/०२/२०२४ रोजी कळविल्यानंतर श्री.न.ग.बाहे, उपसंचालक बाष्पके, नाशिक यांनी दिनांक ०७/१२/२०२४ रोजी अपघाताच्या चौकशी करीता कारखान्याला भेट दिली. श्री.न.ग.बाहे, उपसंचालक बाष्पके, नाशिक यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये असे आढळून आले की, बाष्पकातील पाण्याची पातळी धोकादायक कमी होऊन फरनेस व आयआरसी शेल ला वरील बाजुस फुगवटा आला. सदरील अपघातात कोणतीही व्यक्ती मृत किंवा जखमी झालेली नाही.

### ❖ स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमीत्त ठरविलेली ध्येय व उद्दिष्टे ❖

भारताच्या स्वातंत्र्य दिनाचा ७५ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" म्हणून साजरा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला होता. या निर्णयानुसार विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशांनी स्थानिक पातळीवर, गावोगावी हा उत्सव साजरा केला. त्यानुसार मा. ना. श्री. सुरेश (भाऊ) दगडू खाडे, मंत्री कामगार, महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून, श्रीमती विनिता वेद

सिंगल, प्रधान सचिव, कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या पुढाकाराने आणि श्री घ. प्र. अंतापूरकर, संचालक बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या नेतृत्वात बाष्पके संचालनालयाने खालील नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले.

**राबविलेले उपक्रम :**

### १) महाराष्ट्रातील कमीत कमी ७५ अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतन महाविद्यालये, आय.टी.आय., शाळा, महाविद्यालये आणि टेक्निकल स्कूल येथे "बाष्पके उद्योग क्षेत्रातील रोजगाराच्या संधी" या विषयावर परिसंवादांचे आयोजन

**ध्येय व उद्दिष्टे :**

१) महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालये / तंत्रनिकेतन महाविद्यालये / आंय.टी.आय. / शाळा / महाविद्यालये / टेक्निकल स्कूल येथे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना बाष्पके उद्योगातील रोजगार संधीबद्दल माहिती अवगत करून देणे.

२) विद्यार्थ्यांना बाष्पके उद्योगात रोजगार मिळवण्यासाठी आवश्यक असलेले कौशल्य तसेच आवश्यक अभ्यासक्रम (Courses), व प्रशिक्षण संस्था यांची माहिती देणे.

३) बाष्पके संचालनालयाकडून घेण्यात येणाऱ्या प्रमाणपत्र परीक्षा यांची माहिती व फायदे याबद्दल अवगत करून देणे.

४) बाष्पके उद्योगातील गरजा, समस्या, आणि नवनवीन तंत्रज्ञान याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देणे,

५) राष्ट्राच्या प्रगतीसाठी बाष्पके उद्योगात उद्योजक होण्यासाठी असलेल्या संधींबद्दल माहिती उपलब्ध करून देणे.

६) बाष्पके व त्याचे सुटे भाग निर्मिती करणाऱ्या उद्योगांना प्रशिक्षित आणि कुशल मनुष्यबळ मिळविण्यासाठी मदत करणे.

**ठळक वैशिष्ट्ये:**

- बाष्पके संचालनालयातील अधिकाऱ्यांनी त्यांच्या दैनंदिन कार्यालयीन कामे तसेच कारखान्यांच्या भेटी / दौऱ्यावर परिणाम न होऊ देता स्वतः विविध शैक्षणिक संस्थांमध्ये जाऊन परिसंवाद घेतले.
- अंदाजे ६०००+ विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले.
- या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये रोजगारासाठी जागरूकता निर्माण झाली, तसेच बाष्पके उद्योग क्षेत्रात त्यांचा सहभाग वाढला.
- राज्यातील विविध वृत्तपत्रांनी या उपक्रमाची दखल घेत बातम्या प्रकाशित केल्या.

### २) बाष्पके संचालनालयाच्या ग्रंथालयात स्वातंत्र्यवीरांचे तसेच राष्ट्रपुरुषांचे चारित्र्य व स्वातंत्र्य चळवळीची पुस्तके मोफत वाचनासाठी उपलब्ध करणे:

**संकल्पना :**

१) स्वातंत्र्यवीरांचे जीवनकार्य, बलिदान, व स्वातंत्र्य चळवळीचा समृद्ध इतिहास लोकांपर्यंत पोहोचवून त्यातून प्रेरणा देणे आणि राष्ट्रभावनेला प्रोत्साहन देणे.

२) बाष्पके संचालनालयाच्या ग्रंथालयात स्वातंत्र्यवीरांचे चारित्र्य, राष्ट्रपुरुषांचे योगदान, तसेच स्वातंत्र्य चळवळीवर आधारित पुस्तके मोफत वाचनासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या उपक्रमामुळे अभ्यागत व कर्मचाऱ्यांना भारताच्या इतिहासाची ओळख होईल आणि त्यांच्यात प्रेरणा व राष्ट्राभिमानाची भावना निर्माण होईल.

**ध्येय व उद्दिष्टे :**

१) **ऐतिहासिक वारसा जतन करणे:** स्वातंत्र्यसैनिकांचे जीवन, त्यांचे बलिदान, आणि योगदान यांची माहिती एकत्र करून भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा समृद्ध वारसा जतन आणि संवर्धन करणे. यामुळे त्यांचे बलिदान काळाच्या ओघात विसरले जाण्याऐवजी सतत प्रेरणा देत राहील.

२) **शैक्षणिक जागरूकता निर्माण करणे:** स्वातंत्र्य चळवळीतील महत्त्वाच्या घटना आणि योगदानाबद्दल माहिती देणारी मौल्यवान शैक्षणिक संसाधने अभ्यागत व संचालनालयाच्या कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध करून देणे.

### ३) ऊर्जेची बचत आणि प्रदूषण कमी करण्यासाठी बाष्पकांची कार्यक्षमता ३% वाढवण्याचे उद्दिष्ट:

बाष्पक अधिक कार्यक्षमतेने चालवून ऊर्जा बचत, प्रदूषण नियंत्रण, आणि इंधन वापर कमी करण्यासाठी बाष्पके संचालनालयाने ७५ बाष्पकांची कार्यक्षमता ३% वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले व हा उपक्रम यशस्वीरीत्या राबविला गेला. या पथदर्शी प्रयत्नांमुळे केवळ ऊर्जा बचतच झाली नाही, तर कारखान्यांना आर्थिक फायदा व पर्यावरण संरक्षणात योगदानही मिळाले.

**ध्येय व उद्दिष्टे :**

१) **पर्यावरण संवर्धन:** ऊर्जेचा कार्यक्षम वापर करून प्रदूषणाचे प्रमाण कमी करणे.

२) **इंधन बचत:** वाफेच्या कार्यक्षम वापराद्वारे इंधनाची बचत साधणे.

३) **उत्पादकता वाढवणे:** कारखान्यांतील बाष्पकांच्या सुधारित कार्यक्षमतेद्वारे उत्पादनक्षमता वाढवणे.

४) **आर्थिक बचत:** कारखान्यांच्या खर्चात कपात करून आर्थिक बचत साधणे.

५) **पाण्याची बचत:** पाण्याचा अपव्यय टाळून संसाधनांचा जास्तीत जास्त उपयोग करणे.

**उपक्रमाची अंमलबजावणी:**

सदर उपक्रम तीन टप्प्यांत राबविण्यात आला:

- **पहिला टप्पा - ७५ बाष्पकांची निवड:**
  ऊर्जेचे व इंधनाचे मोजमाप करण्याची सक्षम उपकरणे आणि यंत्रणा असलेल्या कारखान्यांतील बाष्पकांची निवड करण्यात आली. यासाठी एमआयडीसी तारापूर, जिल्हा पालघर येथील ८२ कारखान्यांचा समावेश करण्यात आला.
- **दुसरा टप्पा - माहिती संकलन:**
  निवडलेल्या कारखान्यांकडून जवळपास ६० प्रकारची माहिती गोळा करण्यात आली.
- **तिसरा टप्पा - माहितीचे विश्लेषण आणि उपाययोजनाः**
  गोळा केलेल्या माहितीचे सखोल विश्लेषण करण्यात आले. प्रत्येक कारखान्यासाठी सुधारणा करण्यासाठी तांत्रिक उपाययोजना सुचविण्यात आल्या, ज्या बाष्पकांच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी उपयुक्त ठरल्या.

## ❖ बॉयलर वर्ल्ड एक्स्पो - आफ्रिका, २०२३ ❖

बॉयलर वर्ल्ड एक्स्पो - आफ्रिका हे प्रदर्शन व चर्चासत्र नैरोबी, केनिया येथे दिनांक १० ऑगष्ट ते १२ ऑगष्ट, २०२३ रोजी आयोजित करण्यात आले होते. बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना या जागतिक प्रदर्शनात प्रतिनिधित्व करण्यासाठी दिनांक ०७ ऑगष्ट ते १३ ऑगष्ट या कालावधीत आमंत्रित करण्यात आले होते. त्या अनुषंगाने या प्रदर्शनास उपस्थित राहण्यासाठी या विभागाचे शिष्टमंडळ शासनाचे परवानगी पत्र क्र. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, बाष्पके-११२२/प्र. क्र. २०५ (भाग १)/ कामगार-१ दि. ०४.०८.२०२३ अन्वये मा. ना. डॉ. सुरेश (भाऊ) दगडू खाडे, मंत्री (कामगार) यांच्या नेतृत्वात उपस्थित राहिले.

बॉयलर वर्ल्ड आफ्रिका या एक्सपोला जगभरातील १२५ हून अधिक उद्योजग तसेच एकूण १७ देशांनी प्रदर्शक म्हणून सहभाग घेतला होता. एकूण २९ देशांच्या प्रतिनिधीं द्वारे ३६००+ लोकांनी एक्स्पोला भेट दिली, ८ चर्चासत्रांमध्ये १४ नामांकित तज्ञ व्याख्यात्यांद्वारे मार्गदर्शन ही या एक्स्पोची खास वैशिष्टे ठरली. जागतिक बाष्पके क्षेत्रात भारत हा समर्पित व आशादायक नेतृत्व सफलपणे करू शकतो हे मे. ऑरेंजबिक टेक्नॉलोजीस प्रा. लि. यांनी आयोजित केलेल्या बॉयलर वर्ल्ड आफ्रिकेच्या निमित्ताने सिध्द झाले.

या एक्स्पोचे उध्दाटन मा. ना. डॉ. सुरेश (भाऊ) दगडू खाडे, कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य, सु. श्री. नामग्या खांपा, भारताच्या उच्चायुक्त, नैरोबी, केनिया तसेच श्री. नोबी मचारिया, सचिव, उद्योग, केनिया ( डॉ. जुमा मुखवाणा, प्रधान सचिव, स्टेट डिपार्टमेंट ऑफ इंडस्ट्रि, केनिया यांचे प्रतिनिधी ) या मान्यवरांच्या हस्ते पार पडले. या उद्घाटनाला डॉ. मुसा नुंदुसी, सचिव व्यावसायिक आरोग्य व सुरक्षा संचालनालय, केनिया ( मा. फ्लोरेन्स बोर, कॅबिनेट सेक्रेटरी, कामगार आणि सामाजिक संरक्षण, केनिया यांचे प्रतिनिधी ), श्री भानू राजगोपालन, व्यवस्थापकीय संचालक, मे. ऑरेंजबीक टेक्नोलॉजीस प्रा. लि. व श्री. धवल अंतापूरकर, संचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य हे मान्यवर उपस्थित होते. मा. ना. डॉ. सुरेश (भाऊ) दगडू खाडे, कामगार मंत्री यांनी भारतीय बाष्पके विनियम -१९५० ( IBR-१९५० ) कोड केनियाने स्वीकारला तर आम्ही जगातील सर्वोत्तम बाष्पके अगदी कमी खर्चात पुरवू शकतो असा प्रस्ताव केनिया सरकार समोर सादर केला तसेच तांत्रिक ज्ञानाच्या देवाण- घेवाणीसाठी केनिया सरकारने एक व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे असे सुचविले होते. त्यास अनुसरून केनिया सरकारने भारतीय बाष्पके विनियम -१९५० च्या धर्तीवर केनियन बाष्पके विनियम बनविण्यासाठी महाराष्ट्र शासनासोबत एम. ओ. यू करण्यास उत्सुकता दर्शविली आहे.

केनिया व पूर्व आफ्रिकेतील बाष्पक वापरकर्ते, दुरुस्तीकार व इतर क्षेत्रातील उपस्थितांसाठी श्री. धवल अंतापूरकर, संचालक, बाष्पके संचालनालय व श्री. गजानन वानखेडे, सहसंचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई यांनी दिनांक ११.०८.२०२३ रोजी आयोजित चर्चासत्रात सहभाग घेतला आणि चर्चासत्रात भारतीय बाष्पके विनियम -१९५० याबद्दल तसेच भारतातील बाष्पक निर्मिती, वेल्डर चाचणी, बाष्पक परिचर व बाष्पक अभियंता चाचणी, विविध अवस्थाबध्द तपासणी, निर्गमित करण्यात येणारे विविध प्रमाणपत्र याबाबत परिसंवाद दिले.

### ❖ ई -गवर्नेंस चा भाग म्हणून बाष्पके संचालनालयाद्वारे “महापार प्रणाली” अंगीकृत ❖

बाष्पके संचालनालयाने वर्ग-१ आणि वर्ग-२ अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल (Confidential Report - CR) सादर करण्यासाठी "महापार प्रणाली" लागू केली आहे. या प्रणालीच्या माध्यमातून वर्ग १ आणि वर्ग २ अधिकाऱ्यांचे वार्षिक गोपनीय अहवाल ऑनलाइन पद्धतीने सादर करता येतात. महापार प्रणालीमुळे अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालांच्या सादरीकरणाची प्रक्रिया सुलभ, वेगवान होईल तसेच यामुळे कागदपत्रांवरील काम कमी होऊन डिजिटल प्रक्रियेला प्रोत्साहन मिळनार आहे.

या आर्थिक वर्षात बाष्पके संचालनालयातिल सर्व गट-अ व गट-ब अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल महापार प्रणालीद्वारे यशस्वीरित्या सादर करण्यात आले आहेत. यापुढील सर्व गोपनीय अहवालदेखील महापार प्रणालीचा वापर करूनच सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### ❖ बाष्पके संचालनालयाचे बळकटीकरण करणे या योजनेअंतर्गत सहसंचालक बाष्पके, नागपूर यांचे कार्यालय तसेच सहसंचालक बाष्पके, अ'नगर यांचे कार्यालय द्वारे जनजागृति अभियान ❖

या संचालनालयाच्या नागपूर विभागीय कार्यालयाद्वारे, शासनाच्या जनजागृति अभियान २०२४ अंतर्गत "बाष्पकांचा सुरक्षित व कार्यक्षम वापर" या विषयावर विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, नागपूर (VNIT) यांच्या संयुक्त विद्यमाने नागपुर येथील सभागृहात दिनांक १७/०२/२०२४ ते १८/०२/२०२४ या दोन दिवसीय कार्यशाळा व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर चर्चासत्र व कार्यशाळेचे उद्घाटन तसेच “बाष्पकाचा सुरक्षित व कार्यक्षमतेने वापर” या पुस्तकाचे अनावरण मा. डॉ. रविंद्र सिंगल, अपर पोलिस महासंचालक, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांच्या शुभ हस्ते तसेच श्री. धवल अंतापुरकर ( संचालक, बाष्पके संचालनालय ), श्री. पंकज सपाटे (कार्यकारी संचालक, महानिर्मिती ), श्री. प्रमोद पडोळे ( संचालक, विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, नागपुर ), श्री. अनिल पालमवार ( माजी संचालक, महावितरण ), श्री. संजय मानकर (सह संचालक, बाष्पके संचालनालय, नागपुर )तसेच बाष्पके संचालनालयाचे सर्व विभागातील अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितित पार पडले. सदर चर्चासत्रात जवळपास ६५० पेक्षा जास्त बाष्पक प्रचालन अभियंते, बाष्पक परीचर, बाष्पक व त्याचे सुटे भाग निर्मिती करणारे कारखानदार व प्रतिनिधी सहभागी झाले. या कार्यशाळेत बाष्पकांच्या क्षेत्रातील १६ तज्ञ व्यक्तींकडून विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

या संचालनालयाच्या अ'नगर विभागीय कार्यालयाद्वारे दि. २९/०२/२०२४ ते ०१/०३/२०२४ रोजी बाष्पकांचा सुरक्षित व कार्यक्षम वापर या विषयावर जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन श्री. बिपिन दादा कोल्हे (अध्यक्ष , संजीवनी उद्योग समूह ) यांच्या शुभ हस्ते तसेच श्री. वीरेंद्र दादा जगताप (चेअरमन, लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना, तेलगाव, जिल्हा बीड), श्री. धवल अंतापुरकर (संचालक, बाष्पके संचालनालय ), व श्री. नरेंद्र भोइटे (सह संचालक, बाष्पके संचालनालय, अ'नगर ) तसेच बाष्पके संचालनालयाचे सर्व विभागातील अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितित पार पडले. या दोन दिवसीय कार्यशाळेत जवळपास ५५० पेक्षा जास्त बाष्पक प्रचालन अभियंते, बाष्पक परीचर, बाष्पक व त्याचे सुटे भाग निर्मिती करणारे कारखानदार व प्रतिनिधी सहभागी झाले. या कार्यशाळेत बाष्पकांच्या क्षेत्रातील १४ तज्ञ व्यक्तींकडून विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

## ❖ विशेष बाबी ❖

या संचालनालयाचे "गतीमान, पारदर्शक सार्वजनिक देय व्यवस्था, प्रक्रियांचे सुलभिकरण आणि संगणकासह आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब" हे ध्येय साध्य करणेसाठी सर्व कार्यालयांचे संपुर्ण संगणकीकरण हे उद्यीष्ठ ई-ऑफिस द्वारे साध्य करणेचे योजिले आहे. त्यानुसार कार्यालयातील पत्रव्यवहार व अभिलेख्यांचे जतन हे संगणकीकृत होऊन कामकाजामध्ये सुलभता येणार आहे. कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची कामे गतिमान व सुलभ होऊन, शासनाच्या सेवा वेळेत पुरविणे सोपे होईल.

केंद्र शासनाच्या केंद्रिकृत निरीक्षण प्रणाली (CIS) अंतर्गत सर्व विभागातील अधिका-यांनी नियोजीत भेटीसाठी दौरे केले व बाष्पकांचे/मितोपयोजकांचे तत्कालीन स्थितीतील निरीक्षण करुन, सदर प्रणालीमध्ये अहवाल सादर केले, तसेच बाष्पके अधिनियम व त्याखालील नियमांच्या तरतुदीनुसार बाष्पके कार्यरत आहेत का याची पाहणी केली. या निरीक्षणा दरम्यान कार्यरत बाष्पक / मितोपयाजकांमध्ये काही त्रुटी आढळल्यास त्यांची पुर्तता करण्यात आली.

अधिका-यांच्या नियोजीत भेटी दरम्यान, परिसरातील कारखान्यांना भेटी देऊन, जर त्या कारखान्यांमध्ये अनाधिकृत किंवा बेकायदेशीर बाष्पक आढळल्यास, अशा बाष्पकांना प्रतिबंधीत करुन, बाष्पके अधिनियम व नियमांनुसार निरीक्षण करणेस सांगीतले जाते. यानुसार अहवालांकीत वर्षामध्ये **०६** बाष्पकांना प्रतिबंधीत आदेश व बाष्पकाची धारण क्षमता चाचणी करणेबाबत सुचना निर्गमित करणेत आल्या.

## ❖ बाष्पके संचालनालय एक दष्टीक्षेप ❖

सन २०२३-२४ या वार्षिक अहवाल कालावधीत अधिका-यांनी **५१०६** बाष्पकांना भेटी देऊन, बाष्पकांची निरीक्षणे केली व **४१८९** बाष्पकांना प्रमाणपत्रे निर्गमीत करण्यात आली.

महाराष्ट्र राज्यात एकूण **९६८** बाष्पकांची निर्मिती झाली त्यापैकी **२७२** बाष्पके महाराष्ट्र राज्यात विकली गेली, तसेच इतर राज्यात **८६** बाष्पके व परदेशात **०८** बाष्पके विकली गेली. या संचालनालयाच्या अधिका-यांनी निर्मिती अवस्थेमधील बाष्पके, मितोपयोजके, हिट एक्सचेंजर, प्रेशर पार्टस इ. निरीक्षणासाठी **५३१५** भेटी दिल्या. साधारण दहा वर्षापूर्वी बाष्पक आणि त्याचे पार्ट व संयत्रे निर्मिती करण-या कारखान्यांची संख्या अत्यल्प होती व प्रतीवर्षी यात वाढ होत गेली. सद्यस्थितीत बाष्पके व त्याचे प्रेशरपार्टस, लघु औदयोगिक बाष्पके, मितोपयोजके, प्रेशर व्हेसल्स, हिट एक्सचेंजर, माउंटींग / फिटींग्ज/ व्हॉल्वज निर्मिती करणारे कारखाने, तसेच टेस्टींग लॅबोरेटरीज, हिट ट्रिटर्स, पाईप फॅब्रिकेटर, इरेक्टर्स व रिपेअर्स या इतर सेवा देणा-या कारखान्यासहीत मान्यताप्राप्त कारखान्यांची एकूण संख्या **१४७१** इतकी आहे.

राज्यात विजेचा तुटवडा अधिक जाणवू लागल्याने,उद्योगावर अनिष्ठ परिणाम होऊ लागला अशा परिस्थितीत महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड, टाटा पॉवर कंपनी, मुंबई आणि अदानी पॉवर, डहाणू यासारख्या विद्युत केंद्रांना उपलब्ध इंधनाद्वारे महाराष्ट्र राज्याचा विद्युत पुरवठा अखंडीत चालू ठेवण्यासाठी त्यांची बाष्पके सतत चालू ठेवावी लागली. तसेच इंधन प्रक्रिया करण्यासाठी रीफायनरीज व खते निर्मितीसाठी फर्टीलायझर कंपन्या सुध्दा पुर्ण क्षमतेने व अखंडपणे कार्यान्वित राहणे गरजेचे आहे. त्याकरिता मे. भारत पेट्रोलियम, मे. हिंदुस्थान पेट्रोलियम व मे.राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टीलायझर्स या कंपन्यांनाही त्यांची बाष्पके सतत चालू ठेवावी लागली. या संचालनालयाने बहुतांशी बाष्पकांचे वेळेवर निरीक्षण करून दिले. त्यामुळेच तेल कंपन्यांना आपली उत्पादनाची उद्दीष्टे साध्य करण्यास आणि राज्याची विद्युत पुरवठयातील तूट कमी करण्यास मदत झाली.

महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळ सहकारी साखर कारखान्यामुळे वाढली, फोफावली हे सर्वश्रृत आहे. त्यामुळे खेडयापाडयात लहान मोठे पुरक उद्योग उभे राहिले. सहकारी व खाजगी साखर कारखाने सक्षमरित्या पूर्ण ताकदीने चालविण्यासाठी सर्व प्रथम बाष्पकाची गरज असते. गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वी बाष्पक निरीक्षण, बाष्पक दुरूस्ती व जलदाब चाचणी इत्यादी महत्वपूर्ण कामे कारखान्यांना पूर्ण करावी लागतात. अर्थात या कामासाठी या संचालनालयाच्या निरीक्षण अधिका-यांच्या सहकार्याची आवश्यकता असते. सहकारी साखर कारखाने आर्थिक अडचणीत असताना गळीत हंगाम वेळेवर सुरू करण्यासाठी या संचालनालयाच्या निरीक्षण अधिका-यांनी बाष्पक निरीक्षणे वेळेवर करणे आवश्यक होते. या संचालनालयाच्या निरीक्षण अधिका-यांनी योग्य नियोजन करून सर्वच्या सर्व साखर कारखान्यांतील बाष्पकांची त्यांच्या वेळेच्या मागणीनुसार वेळेवर निरीक्षणे पार पाडली. त्यामुळे साखर कारखान्यांना जास्तीत जास्त ऊसाचे गाळप करता आले.

बाष्पक निरीक्षण अधिका-यांनी स्थापित कारखान्यांना वेळोवेळी नियोजनपुर्वक निरीक्षण भेटी दिल्याने त्यांची उदिदष्टे पूर्ण होऊ शकली व परिणामी या विभागाचा महाराष्ट्रात नवीन कारखाने निर्मितीमध्ये व राज्याच्या औद्योगिक प्रगतीस हातभार लागला व रोजगार निर्मितीत वाढ झाली.

अस्तित्वात असलेल्या व नवनिर्मित बाष्पकांचे/मितीपयोजकांचे निरीक्षण, बाष्पनलिका, टयुबा व माऊटिग/फिटींग्ज इत्यादी बाष्पकाच्या सुटया भागांचे निरीक्षण, बाष्पदाब चाचणी असा निरीक्षणाचा मोठया प्रमाणावर असलेला वार्षिक निरीक्षण कार्यक्रम या संचालनालयातर्फे ०१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ पर्यत निरीक्षण अधिका-यांची, सहाय्यक कर्मचा-यांची संख्या अत्यंत अपूरी असताना देखील अनेक अडचणीतून मार्ग काढीत पार पाडला, यामध्ये उपलब्ध अधिकारी/कर्मचा-यांनी परिश्रमपूर्वक बहुमोल सहकार्य केले.

**(ध.प्र.अंतापूरकर)**
संचालक, बाष्पके संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.



















स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवा निमित्त  महाराष्ट्रातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतन महाविद्यालये, आय.टी.आय., शाळा, महाविद्यालये आणि टेक्निकल स्कूल येथे “बाष्पके उद्योग  क्षेत्रातील रोजगाराच्या संधी ” या विषयावर परिसंवाद करत असताना बाष्पके संचालनालयातील  अधिकारी






## डॉ. विखे पाटील अभियांत्रिकीत कौशल्य विकास आणि स्टीम बॉयलर इंडस्ट्रीमध्ये 'करिअर संधी' वर परिसंवाद

नगर -डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या यंत्र अभियांत्रिकी विभाग व विद्युत अभियांत्रिकी विभाग याच्या संयुक्त विद्यमाने डॉ. विठ्ठलराव विखेपाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील यांत्रिकी विभागात कौशल्य विकास आणि स्टीम बॉयलर इंडस्ट्रीमधील करिअर संधी या विषयावर एक्सपर्ट लेक्चरचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात एक्सपर्ट लेक्चर साठी व्याख्याते म्हणून कामगार विभागाचे स्टीम बॉयलर डीव्हीजनचे संयुक्त संचालक नरेंद्र भोईटे संयुक्त संचालक यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. त्यांनी इंडस्ट्रीमध्ये स्टीम बांगरणी निर्माती व त्यासंबंधी कायदे व शासन नियमावली तसेच विविध इंडस्ट्रीमधील स्टीम बॉयलरची उपयुक्तता आणि अर्थशास्त्र याबाबत सविस्तर माहिती देवून स्टीम बॉयलर इंडस्ट्रीमध्ये करिअर संधी तसेच चालेन्जेस व त्याअनुशंगाने विद्यार्थ्यांसाठी लागणारा कौशल्य विकास या संदर्भात विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

सदरील एक्सपर्ट लेक्चरचे आयोजन अंतिम वर्षामध्ये शिकणाऱ्या यांत्रिकी तसेच विद्युत अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी केले होते. या विभागातील विद्यार्थ्यांना करिअर निवडी संदर्भात मार्गदर्शन मिळावे, त्याचा फायदा भविष्यात मिळावा याकरिता सदरील एक्सपर्ट लेक्चरच्या आयोजनासाठी सेक्रेटरी जनरल (टेक्निकल) डॉ. पी. एम. गायकवाड, डेप्युटी डायरेक्टर (टेक्निकल) सुनिल कल्हापुरे, प्राचार्य डॉ. उदय नाईक इत्यादींनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

तसेच यंत्र अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख डॉ. रविंद्र नवथर व विद्युत अभियांत्रिकाचे विभागप्रमुख डॉ. अजित लावरे यानी एक्सपर्ट लेक्चरच्या आयोजनासाठी विशेष प्रयत्न करून स्टीम बॉयलर स्टीम मध्ये करिअर संधी या बाबत विनामुल्य मार्गदर्शन करण्यात आले.

तर या विषयाचे अभियांत्रिकीतील महत्व विशद करून या एक्सपर्ट लेक्चरमध्ये सहभागी सर्व शिक्षक व मान्यवरांचे व विद्यार्थ्यांचे आभार मानले. सदरील एक्सपर्ट लेक्चरसाठी स्वप्नील राजूरकर, उप संचालक, स्टीम बॉयलर डिव्हीजन कामगार विभाग अहमदनगर महाराष्ट्र शासन, अक्षय विखे, इंजिनिअर को जनरेशन प्लॅन्ट पदमश्री डॉ. विठ्ठलराव सहकारी साखर कारखाना, प्रवरानगर व अमोल पोलप, इन्स्टुमेंटेशन इंजिनिअर उपस्थित होते.

विळद घाट येथील डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात कौशल्य विकास व स्टीम बॉयलर इंडस्ट्रीज मधील करिअर संधी विषयावर परिसंवाद झाला.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवा निमित्त राष्ट्रपुरूषांचे चारित्रात्मक व स्वातंत्र्य चळवळीची पुस्तके कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आली.



या संचालनालयाचे उप संचालक श्री. संदीप कुंभार यांची संघ लोकसेवा आयोग (UPSC) मार्फत तांत्रिक सल्लागार तथा सचिव केंद्रीय बाष्पके मंडळ, नवी दिल्ली या पदावर निवड झाल्याबद्दल मा. कामगार आयुक्त श्री. सतीश देशमुख (भा.प्र.से), श्री. धवल अंतापूरकर, संचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य, श्री. ग. दा. वानखेडे, सहसंचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई व इतर अधिकारी, कर्मचारी, बाष्पक परिचर संघटनेचे पदाधिकारी यांच्या उपस्थित सत्कार करण्यात आला.







१ मे २०२३ रोजी पुणे येथे आयोजित कामगार मेळाव्यातील बाष्पके संचालनालयाच्या स्टॉलला मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली





नागपूर विभागीय कार्यालयाद्वारे, शासनाच्या जनजागृति अभियान २०२४ अंतर्गत "बाष्पकांचा सुरक्षित व कार्यक्षम वापर" या विषयावर VNIT, नागपूर येथे चर्चासत्र व कार्यशाळेचे उद्घाटन मा. डॉ. रविंद्र सिंगल, अपर पोलिस महासंचालक, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांच्या शुभ हस्ते तसेच श्री. पंकज सपाटे (कार्यकारी संचालक, महानिर्मिती ), श्री. प्रमोद पडोळे (संचालक, VNIT, नागपुर), श्री. अनिल पालमवार (माजी संचालक, महावितरण), श्री. धवल अंतापुरकर (संचालक, बाष्पके संचालनालय) व श्री. संजय मानकर (सह संचालक, बाष्पके संचालनालय, नागपुर) यांच्या प्रमुख उपस्थितित पार पडले.

अहिल्यानगर विभागीय कार्यालयाद्वारे शासनाच्या जनजागृति अभियान २०२४ अंतर्गत “बाष्पकांचा सुरक्षित व कार्यक्षम वापर” या विषयावर छत्रपती संभाजी नगर येथे जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा.श्री.बिपिन दादा कोल्हे (अध्यक्ष, संजीवनी उद्योग समूह) यांच्या शुभ हस्ते तसेच श्री. वीरेंद्र दादा जगताप (चेअरमन, लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना, तेलगाव, जिल्हा बीड), श्री. धवल अंतापुरकर (संचालक, बाष्पके संचालनालय), व श्री. नरेंद्र भोइटे (सह संचालक, बाष्पके संचालनालय, अ’नगर )यांच्या प्रमुख उपस्थितित पार पडले.







बाष्पके संचालनालयाचे संचालक श्री. धवल अंतापूरकर व श्री. गजानन वानखेडे, सहसंचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई यांनी बॉयलर वर्ल्ड आफ्रिका, २०२३ नैरोबी, केनिया येथे आयोजित चर्चासत्रात सहभाग घेतला व भारतीय बाष्पके विनियम -१९५० याबद्दल परिसंवाद दिले.



नैरोबी , केनिया येथे आयोजित बॉयलर वर्ल्ड आफ्रिका, २०२३ या चर्चासत्र व प्रदर्शनीला बाष्पके संचालनालयातील प्रतिनिधि / अधिकारी मान्यवरां सोबत